-: प्रेसनोट दिनांक- २७/०२/२०२३ :-

**आरोपी लोकसेवक १ मारूती परशुराम वरूटे, वय- ५० वर्षे, सहायक अधीक्षक, उपसंचालक आरोग्य सेवा कार्यालय कोल्हापूर सद्या रा. प्लॉट नं.४, सुनंदा पार्क, पोतदार हायस्कुल जवळ कोल्हापूर, मुळ रा. कासारपुतळे, ता. राधानगरी , जि.कोल्हापूर २) विलास जिवनराव शिंदि, वय - ५७ वर्षे, चालक ग्रामीण रूग्णालय पारगाव, ता. हातकणंगले सध्या रा. सरकारी हॉस्पीटल कॉलनी पारगाव, ता. हातकणंगले, मुळ रा. किणी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर ३) शिवम विलास शिंदि, वय - २२ वर्षे, सध्या रा. सरकारी हॉस्पीटल कॉलनी पारगाव, ता. हातकणंगले, मुळ रा . किणी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर (खाजगी इसम) यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

तक्रारदार यांना सेवानिवृत्तीनंतर मिळाणारे लाभातील रजा रोखीकरण प्रस्ताव उपसंचालक, आरोग्य सेवा कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर कार्यालयात सादर करणेत आलेला आहे. सदर कार्यालयातील सहायक अधीक्षक वरूटे यांनी रजा रोखीकरणाचे प्रस्तावामध्ये त्रुटी काढत नाही व प्रस्तावात अतिरिक्त रजेसह मंजुर करतो, पण त्यासाठी तुम्ही ३०,०००/- रूपये द्यावे लागतील असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे लाच मागणी केली.

दिनांक २९/०५/२०२३ रोजी तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार अर्ज दिला. तक्रारीप्रमाणे दिनांक २९/०५/२०२३ रोजी पडताळणी केली असता पडताळणीमध्ये आरोपी नंबर ०१ याने तक्रारदार यांचेकडे त्यांचे रजा रोखीकरणचा प्रस्ताव विना त्रुटी मंजुर करणेकरीता प्रस्ताव अतिरिक्त रजेसह मंजुर करतो म्हणुन ३०,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती २५,०००/- रूपये लाचेची मागणी करून लाच कोणाकडे द्यायची याबाबत दिनांक ३०/०५/२०२३ रोजी कळवित असल्याचे निषन्न झाले

त्यानंतर दिनांक ३०/०५/२०२३ रोजी सापळा कारवाई आयोजीत केली असता सहायक अधीक्षक वरूटे यांनी लाच रक्कम आरोपी क्र ०२ विलास शिंदे यांचेकडे देण्यास सांगीतली. त्याप्रमाणे आरोपी क्र. २ व ३ हे तक्रारदार यांचेकडे लाच स्विकारण्यास आले त्यावेळी आरोपी क्र.२ विलास शिंदे यांनी तक्रारदार यांचेकडे आरोपी क्र.१ वरूटे यांनी मागणी केलेले २५,०००/- रूपये मागणी करून सदरचे पैसे आरोपी क्र.३ शिवम शिंदे याचेकडे देण्यास सांगीतले. त्याप्रमाणे पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन खाजगी इसम आरोपी नंबर ३ नामे शिवम शिंदे यांनी २५,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने आरोपी क्र.२ व ३ यांना रंगेहाथ पकडणेत आले आहे.

सदरबाबत **१ मारूती परशुराम वरूटे, वय- ५० वर्षे, सहायक अधीक्षक, उपसंचालक आरोग्य सेवा कार्यालय कोल्हापूर २) विलास जिवनराव शिंदि, वय - ५७ वर्षे, चालक ग्रामीण रूग्णालय पारगाव, ता. हातकणंगले ३) शिवम विलास शिंदि, वय - २२ वर्षे, सध्या रा. सरकारी हॉस्पीटल कॉलनी पारगाव, ता. हातकणंगले, (खाजगी इसम)** यांचेविरूध्द कोडोली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, पो.हे.कॉ. विकास माने, पो.हे.कॉ. सुनिल घोसाळकर, पो.कॉ.मयुर देसाई, पो.कॉ. रूपेश माने, चा.पो.हे. कॉ. विष्णु गुरव ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१
२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.
३) श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.
४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.
५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.